सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १५ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ६२ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


### विम्बल्डनच्या बक्षिसात वाढ

नवी दिल्ली : टेनिस विश्वातील सर्वात प्रतिष्ठेच्या ग्रँडस्लॅम स्पर्धांपैकी एक असलेल्या विम्बल्डनने यंदा बक्षीस रकमेत विक्रमी वाढ जाहीर करत खेळाडूंना मोठी भेट दिली आहे. २०२६ हंगामासाठी स्पर्धेच्या एकूण पारितोषिक रकमेत तब्बल २० टक्क्यांची वाढ करण्यात आली असून पुरुष आणि महिला एकेरी गटातील विजेत्यांना प्रत्येकी ३.६ दशलक्ष पौंड म्हणजेच सुमारे ४६ कोटी रुपये मिळणार आहेत. विम्बल्डनच्या इतिहासातील ही सर्वात मोठी वार्षिक बक्षीसवाढ मानली जात आहे. यंदाच्या स्पर्धेची एकूण बक्षीस रक्कम ६४.२ दशलक्ष पौंड (सुमारे ८५० कोटी रुपये) इतकी निश्र्चित करण्यात आली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत ही रक्कम १०.७ दशलक्ष पौंडांनी अधिक असून स्पर्धेच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे आणि आर्थिक यशामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

### इंद्रायणीत मासे मृतावस्थेत

पुणे : वारकरी संप्रदायाचे प्रमुख श्रद्धास्थान असलेल्या देहू येथील इंद्रायणी मध्ये पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर मासे मृत अवस्थेत आढळल्याने परिसरात चिंता व्यक्त केली जात आहे. नदीकाठावर मृत माशांचा खच दिसून आल्याने पाण्याच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. आषाढी वारीदरम्यान लाखो वारकरी देहू आणि पंढरपूर मार्गावरील धार्मिक स्थळांना भेट देतात. इंद्रायणी नदीला वारकरी परंपरेत विशेष धार्मिक महत्त्व आहे. अशा वेळी नदीतील मोठ्या प्रमाणातील मासेमृत्यू ही केवळ पर्यावरणीय घटना नसून सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि तीर्थक्षेत्र व्यवस्थापनाशी संबंधित बाब असल्याचे मानले जात आहे.

# पेट्रोल-डिझेल पुन्हा महागणार ?



वृत्तसंस्था

त्रिशूर : भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या दरांबाबत पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. नुकतेच केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी केलेल्या एका विधानाने जनतेच्या मनात आगामी काळात इंधन दरवाढ होणार का, असा प्रश्न निर्माण केला आहे.

सरकारकडून सध्यातरी याबाबत कोणतीही थेट घोषणा करण्यात आलेली नसली, तरी भविष्यातील पेट्रोल-डिझेलचे दर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कच्च्या तेलाच्या स्थितीवर अवलंबून असतील, असे संकेत मंत्र्यांच्या विधानातून मिळाले आहेत. केरळमधील त्रिशूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना सुरेश गोपी यांनी स्पष्ट केले की, सरकार सध्या जागतिक ऊर्जा बाजारावर बारकाईने लक्ष ठेवून आहे. पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किमतींमधील कोणताही बदल हा कच्च्या तेलाची उपलब्धता आणि त्याच्या पुरवठ्याची स्थिरता विचारात घेऊनच केला जाईल. इंधनाचे दर पुन्हा वाढणार का, या प्रश्नावर उत्तर देताना त्यांनी सांगितले की, प्रथम कच्च्या तेलाचा पुरवठा कसा राहतो हे पाहावे लागेल. यावर अंतिम निर्णय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी आणि संबंधित मंत्रालय घेईल.गेल्या काही काळापासून पश्र्चिम आशियात सुरू असलेल्या तणाव आणि संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारपेठ प्रभावित झाली आहे.

या भागातून जगातील मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाचा आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा केला जातो. तिथल्या कोणत्याही भू-राजकीय अस्थिरतेमुळे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ होऊ शकते, ज्याचा थेट फटका भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांना बसतो. भारत आपल्या गरजेच्या जवळपास ८५ टक्के कच्चे तेल परदेशातून खरेदी करतो, त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात किमती वाढल्यास देशांतर्गत इंधनाचा खर्चही वाढतो. गेल्या काही आठवड्यांत एलपीजी सिलिंडर, पेट्रोल आणि डिझेलच्या दरात काही प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, जर कच्च्या तेलाच्या किमती दीर्घकाळापर्यंत उच्च पातळीवर राहिल्या किंवा पुरवठ्यात अडथळा निर्माण झाला, तर तेल कंपन्यांवरील दबाव वाढू शकतो. अशा परिस्थितीत सरकार आणि कंपन्यांना किमतींचा पुनर्विचार करावा लागू शकतो. सर्वसामान्यांसाठी दिलासादायक बाब म्हणजे सरकार सध्या घाईघाईने कोणताही निर्णय घेऊ इच्छित नाही. संबंधित मंत्रालय आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील परिस्थिती, तेलाची उपलब्धता आणि देशातील ऊर्जेची गरज याचा सातत्याने आढावा घेत आहे. जर कच्च्या तेलाच्या किमतीत घसरण झाली आणि पुरवठा सुरळीत राहिला, तर पेट्रोल-डिझेलच्या दरात मोठ्या वाढीची शक्यता कमी होऊ शकते.सध्या इंधनाचे दर वाढणार की नाही हे निश्र्चित सांगणे कठीण असले, तरी सुरेश गोपी यांच्या विधानातून सरकार संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आगामी काळात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कच्च्या तेलाची वाटचालच भारतीय ग्राहकांना पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीसाठी किती पैसे मोजावे लागतील हे ठरवणार आहे. त्यामुळे वाहनचालक आणि सामान्य ग्राहकांचे डोळे आता जागतिक तेल बाजार आणि सरकारच्या पुढील पावलाकडे लागले आहेत.

# भारतीय लष्कराच्या गणवेशात मोठे बदल



वृत्तसंस्था

नवी दिल्ली : भारतीय लष्कराने वसाहतकालीन परंपरांपासून दूर जात आपल्या गणवेश संहितेत महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. औपचारिक प्रसंगी अधिकाऱ्यांना आता पारंपरिक भारतीय शैलीतील 'बंदी जॅकेट' परिधान करण्याची परवानगी देण्यात आली आहे. यासोबतच समारंभीय पाऊच बेल्टचा वापर कमी करण्यात आला असून संचलनादरम्यान पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी तलवार बाळगणे ऐच्छिक करण्यात आले आहे.हे सर्व बदल 'आर्मी युनिफॉर्म्स-२०२६' या नव्या १७४ पानी नियमावलीत समाविष्ट करण्यात आले आहेत. तब्बल आठ वर्षांनंतर प्रकाशित झालेल्या या नियमावलीत भारतीय ओळख अधिक ठळक करण्यासाठी आणि ब्रिटिशकालीन अवशेष दूर करण्यासाठी अनेक सुधारणा करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. लष्कराच्या मते, हे बदल भारतीय लष्कराची प्रतिष्ठा, कार्यक्षमता आणि परंपरा जपत आधुनिक भारतीय विचारांशी सुसंगत आहेत.

नवीन नियमांनुसार सर्व श्रेणीतील सैनिकांसाठी '३इ' नावाचा हिवाळी गणवेश सादर करण्यात आला आहे. या गणवेशात अंगोला शर्ट, बॅटल जॅकेट आणि बेरेटचा समावेश आहे. तसेच टॅटू, बॉडी पियर्सिंग, केशभूषा, मिशा आणि वैयक्तिक देखभालीसंबंधीचे नियमही अधिक स्पष्ट करण्यात आले आहेत. औपचारिक पोशाखात बंदगला, लाउंज सूट किंवा फुलबाह्यांचा शर्ट आणि ट्राउझर्ससोबत आता 'बंदी जॅकेट' घालण्याची मुभा देण्यात आली आहे. हे जॅकेट साध्या आणि सौम्य रंगाचे असावे तसेच त्यासोबत त्याच रंगातील फॉर्मल ट्राउझर्स आणि बंद फॉर्मल शूज वापरणे आवश्यक असेल.महिला अधिकाऱ्यांसाठीही पोशाखाचे नियम स्पष्ट करण्यात आले आहेत. त्यांना साध्या रंगाची साडी किंवा कुर्ता-सलवारसोबत सरळ पँट आणि दुपट्टा वापरण्याची परवानगी आहे. मात्र स्लीव्हलेस कुर्ते, पलाझो किंवा सिगारेट पँटसारख्या कॅज्युअल पोशाखांवर बंदी घालण्यात आली आहे.

लष्कराने मेस ड्रेस क्रमांक ५ आणि ६ मधून पाऊच बेल्ट काढून टाकले आहेत. हे ड्रेस राष्ट्रपती भवन, राजभवन, पंतप्रधान निवासस्थान किंवा परदेशी राष्ट्रप्रमुखांच्या सन्मानार्थ आयोजित शासकीय समारंभांमध्ये वापरले जातात. मात्र काही विशिष्ट रेजिमेंट्स आणि कॉर्प्ससाठी समारंभीय कार्यक्रमांमध्ये पाऊच बेल्ट वापरण्याची मुभा कायम ठेवण्यात आली आहे.

नव्या नियमावलीत 'रॉयल'सारखे ब्रिटिशकालीन शब्दही वगळण्यात आले आहेत. डज्युटंट जनरल लेफ्टनंट जनरल व्ही. पी. एस. कौशिक यांनी प्रस्तावनेत नमूद केले आहे की, लष्करी गणवेशातील उरलेल्या वसाहतकालीन प्रथा आणि परिभाषा हटवून त्याला आधुनिक भारतीय दृष्टिकोनाशी जोडण्याचा हा प्रयत्न आहे. दरम्यान, सैनिकांसाठी टॅटू आणि बॉडी पियर्सिंगवर बंदी कायम ठेवण्यात आली आहे. गणवेशात असताना ब्रेसलेट घालण्यास मनाई असून केवळ धार्मिक कारणांसाठी मनगटावर पवित्र धागा बांधण्याची परवानगी आहे. धार्मिक चिन्हे वापरण्यास बंदी असली तरी शीख सैनिकांना त्यातून सूट देण्यात आली आहे.





10 YEAR WARRANTY | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | 72198 21111 | Flipkart | amazon.in

*नियम आणि अटी लागू. बचत निवडक मॉडेल्सवर 1 जून पासून 30 जून 2026 पर्यंत उपलब्ध. लागू ऑफर्स ह्या मॉडेल्स/राज्यांनुसार बदलू शकतात. ई-कॉम ऑफर्स संबंधित ई-कॉम पार्टनरच्या अटींच्या अधीन. ई-कॉम ऑफर्स पार्टनर्सनुसार बदलू शकतात. दाखवलेले ईएसआरपीज बेस वेरिएंटचे. ऑफर्सच्या अधिक माहितीसाठी कृपया जवळच्या डीलरशिपकडे भेट द्या. पल्सर 125 निऑनवर ₹2 000/– सूट.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad** • **Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Shivratna Bajaj 8975888188, 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031.